आदिवासी घटक कार्याक्रमाअंतर्गत कृषी विषयक व यंत्रमाग विषयक प्रशुल्क कमी करण्यासाठी वीज वितरण आणि पारेषण परवना धारकांना अर्थसहाय्य वितरीत करण्याबाबत. (सन २०१८-१९)

महाराष्ट शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : निधिवि-२०१८/प्र.क्र.१३७/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक -: ०६/०३/२०१९

वाचा -: १. शासन निर्णय उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.८३/उर्जा-५ दि.३१.१०.२०१८
२. आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र. बियुडी-२०१८/प्र.क्र.१०/कार्या-६, दि. १८.०२.२०१९
३. वित विभाग शासन परिपत्रक क्र .अर्थस२०१-८/ प्र.क्र.६९ ३-अर्थ/दि .०२२०१/०४/८
४. वित विभाग शासन परिपत्रक क्र .पुरक२०१-८ प्र.क्र -१३५ ३-अर्थ/दि .०५/१२२०१/८
५. वित विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थस२०१-८/प्र.क्र-६९, दि. २५.०१.२०१९
६. महावितरण कंपनीचे पत्र क्र. पीकॉम/लेखा २९८१३, दि. १९.१२.२०१८

प्रस्तावना

राज्यातील कृषीपंप धारक व यंत्रमाग धारक यांना दरवर्षी वीज वितरण आणि पारेषण परवाना धारकांना अर्थसहाय्य या योजनेखाली सवलतीच्या दरात या महावितरण मार्फत वीज पुरवठा करण्यात येतो. व त्याची प्रतिपूर्ती करण्यासाठी महावितरण कंपनीस अर्थसहाय्य देण्यात येते. यापुढे आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून अनुसूचीत जमातीच्या संबंधीत कृषी व यंत्रमागधारक या वैयक्तिक लाभार्थ्यांना वीज दरात सवलत देण्यासाठी महावितरण कंपनीस रु. १६० कोटी वितरीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत अनुसूचीत जमातीच्या कृषी व यंत्रमागधारक या वैयक्तिक लाभार्थ्यांना वीज दरात सवलत देण्यासाठी रु. १६०,००,००,०००/- (अक्षरी रुपये एकशे साठ कोटी फक्त) महावितरण कंपनीस रोखीने वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या निधीची रक्कम आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत फक्त आदिवासी लाभार्थ्यांना लाभ देय असल्याने सदर तरतूदीतून फक्त अनुसूचीत जमातीच्या लाभार्थ्यांना वीज दर सवलतीपोटी खर्च करण्याची दक्षता महावितरण कंपनीने घ्यावी.

३. सदर निधी मंजूर आराखडयानुसार याच वर्षात खर्च होईल याची दक्षता महावितरण कंपनीने घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्ष निहाय / उप लेखाशिर्ष निहाय तसेच साध्य झालेली भौतिक उद्दीष्ट निहाय माहिती, निधी उपयोगिता प्रणापत्र संबंधीत क्षेत्रीय अधिकारी यांनी आयुक्त आदिवासी विकास नाशिक, सबंधीत अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, आदिवासी विकास विभाग व उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेला पाठविण्याची दक्षता महावितरण कंपनीने घ्यावी.

४. आदिवासी उपयोजनेअंतर्गत फक्त आदिवासी लाभार्थ्यांना लाभ देय असल्याने सदर तरतुदींमधून फक्त अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांच्या वीज दर सवलतीपोटी खर्च करण्यात यावा. तसेच खर्चाचा जिल्हा निहाय तपशील महावितरण कंपनीने ऊर्जा व आदिवासी विकास विभागास तात्काळ सादर करावा.

५. वरील बाबींचा खर्च मागणी क्र.टी-५, मुख्य लेखाशिर्ष २८०१ वीज उप मुख्य लेखाशिर्ष ०५ पारेषण व वितरण गौणशिर्ष ७९६ आदिवासी क्षेत्रउपयोजना गटशिर्ष ०१ आदिवासी क्षेत्र उपयोजना उप गटशिर्ष (०१) (०१) कृषी विषयक व यंत्रमाग विषयक प्रशुल्क कमी करण्यासाठी वीज वितरण / पारेषण परवाना धारकांना अर्थसहाय्य (२८०१५५२५) उद्दीष्ट ३३ अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता मंजूर अर्थसहायातून खर्ची टाकण्यात यावा.

६. सदरची रक्कम अधिदान व लेखा अधिकारी यांच्या मार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव (ऊर्जा-३) व नियंत्रण अधिकारी म्हणून सह सचिव (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी मंजूर झालेली रक्कम रु.१६०,००,००,०००/- (रुपये एकशे साठ कोटी फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्या नावे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरित करण्याची कार्यवाही करावी.

७. वित विभागाच्या दि.०२.०४.२०१८ च्या परिपत्रकातील परिच्छेद-२ ते ९ मधील अटी लागू होत नसल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच परिपत्रकाच्या सोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १ येथील अटीची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच परिशिष्टातील अट क्र. ८ मधील तपासणी सूचीतील अट क्र. १ व ८ ची पूर्तता होत आहे. तपासणी सूचीतील उर्वरीत अटी लागू होत नाहीत. सदर योजना नवीन असल्याने या लेखाशिर्षाअंतर्गत एक वर्षापुर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही व उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही.

८. सदर शासन निर्णय आदिवासी विकास विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ३९३दि. १३.१२.२०१९ अन्वये त्याचप्रमाणे आदिवासी विकास विभागाचा संदर्भिय शासन निर्णय क्र. २ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. आदिवासी विकास विभागाने सदर निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास मंजूरी दिली आहे. त्या अनुषंगाने वित विभागाच्या संदर्भिय परिपत्र क्र. ५ अन्वये ८०% च्या मर्यादेत प्रशासकीय विभागाच्या अधिकारात सदर निधी वितरीत करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०७११०६४०२२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nitin Gaikwad

Digitally signed by Nitin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5892c3fd8686c1921e784a3faa9888d155b03f5591ce11b21a1b5006247f6972, serialNumber=2276ac762af372d872c2f01d5bb5086166f4a6e20a1bdf9762d556a93f5d118e, cn=Nitin Gaikwad
Date: 2019.03.07 11:08:10 +05'30'

(नितिन गायकवाड)
अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१

२. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मंत्रालय, मुंबई ३२
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र -२, नागपूर
५. उप सचिव (ऊर्जा-५) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४००० ०३२.
६. अधिदान व लेखा अधिकारी, (अराप/रालेवि-१)अ मुंबई यांचे कार्यालय
७. कक्ष अधिकारी (रोख), उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४००० ०३२.
८. वित्त विभाग (व्यय-१६ मंत्रालय /(अर्थसंकल्प-१३/साधनसंपत्ती/साऊ/ , मुंबई ४००० ०३२.
९. अवर सचिव, (कार्यासन-१६) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४००० ०३२.
१०. निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४००० ०३२.